परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ 8/कावि/ ११४ /2020
दिनांक- ०4/ 09 /2020

विषय:- **"सारथी हेल्पलाईन" वरील माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवणेबाबत...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांना मनपातील विविध सेवा-सुविधांबाबत माहिती, नागरिकांसाठी राबविणेत येणारे विविध प्रकल्प, विविध सुविधांसाठी अर्जप्रक्रियांची माहिती तसेच विभागांमार्फत पुरविणेत येणा-या सेवा- सुविधांबाबत असणा-या तक्रारींची नोंद करण्यासाठी दिनांक 15/08/2013 रोजी "सारथी हेल्पलाईन" ही नाविन्यपुर्ण संकल्पना सुरु करणेत आली. सध्यस्थितीत सदर हेल्पलाईनवर मनपा सेवा सुविधां व्यतिरिक्त इतर शासकिय विभागांकडील नागरी सेवांबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेत येत आहे.

तथापि, सारथी हेल्पलाईन कार्यान्वित करणेत आलेपासुन अद्ययापपर्यंत मनपातील विविध विभागांमार्फत देण्यात येणा-या सेवा / सुविधांमध्ये बहुतांश प्रमाणात वाढ /बदल झालेला आहे. परंतु सदरबाबतची माहिती सारथी हेल्पलाईनला वेळोवेळी कळविणेत आलेली नसल्यामुळे (उदा. प्राधिकरण हद्दीतील बांधकामाचे परवानगी व अतिक्रमण प्रक्रियेबाबतची माहिती, नागरवस्ती विभागामार्फत राबविणेत येणा-या विविध योजनांबाबतची माहिती, झोनिपु विभागामार्फत नागरिकांसाठी राबविणेत येणा-या विविध प्रकल्पां बाबतची माहिती, फेरीवाले व्यवस्थापन परवानगी प्राक्रियेबाबतची अद्यावत माहिती इ. ) नागरिकांना आवश्यक ती माहिती प्राप्त होत नाही व नागरिकांकडुन मा. आयुक्तांसो यांचेकडे तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे मनपाची तसेच मनपामध्ये कार्यान्वित असलेल्या सारथी हेल्पलाईनची प्रतिमा मलिन होत आहे. तसेच त्यामुळे नागरिकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविणेत येते की, सर्व संबंधित विभागांनी मनपा वेबसाईटवरील सारथी हेल्पलाईन या सदराअंतर्गत आपले विभागामार्फत पाठविणेत आलेल्या **FAQ** ची पडताळणी करुन त्याची प्रिंट काढणेत यावी व त्या **FAQ** मध्ये अंतर्भुत असलेल्या माहितीमध्ये काही बदल असलेस त्याप्रमाणे बदल करुन तसेच आपले विभागाशी संबंधित इतर शासकिय कार्यालयांचे सेवांबाबतची माहिती सारथी हेल्पलाईनवर उपलब्ध करुन देणेकामी दिनांक ११/०९/२०२० पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये सॉफ्टकॉपी व हार्डकॉपी पाठविणेत यावी.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८